पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे

खारकर आळी, कळवा ब्रीज जवळ, ठाणे पश्चिम-४००६०१
ई-मेल- cp.thane.sheetbr@mahapolice.gov.in

जा.क्र.ठाआ/आस्था-२/७/पोभ-२०२४-२५ लेखी परिक्षा सुचना/ ७११ /२०२६, ठाणे, दिनांक २७ /०३/२०२६

पोलीस शिपाई भरती सन २०२४-२५ च्या लेखी परिक्षेच्या अनुषंगाने उमेदवारांना सुचना

१. मैदानी चाचणी वेळी दिलेले ओळखपत्र व Maha IT कडुन लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र सोबत आणणे बंधनकारक आहे. त्याशिवाय उमेदवारांना लेखी परिक्षेस प्रवेश दिला जाणार नाही याची त्यांनी नोंद घ्यावी.

२. उमेदवारांनी आधारकार्ड व पासपोर्ट साईज २ फोटो सोबत आणावेत.

३. परिक्षा केंद्रात भ्रमणध्वनी / डीजीटल डायरी / मायक्रोफोन / मायक्रो कॅमेरा डिव्हाईस / कॅल्क्युलेटर / डीजीटल नोटपॅड/ नोट्स पुस्तके / ईअरफोन / हिअरींग एड डिव्हाईस / स्मार्ट वॉचेस / स्मार्ट आय ग्लासेस इत्यादी तसेच इतर कुठलेही असे साहित्य, ज्याचा कॉपी करण्यासाठी उपयोग होईल अथवा उपयोग होवु शकतो असे साहित्य आणण्यास सक्त मनाई आहे. असे करणारा उमेदवार आढळुन आल्यास त्यास त्याच क्षणी बाद ठरवुन त्यांचे विरुध्द महाराष्ट्र स्पर्धा परिक्षा (अनुचित मागास प्रतिबंध) अधिनियम २०२४ अन्वये कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

४. उमेदवारास बॅग्ज, मोबाईल फोन, डीजीटल / इलेक्ट्रॉनिक्स दुरसंचार साधने इत्यादी प्रतिबंधीत साधने परिक्षा केंद्रात आणण्यास मनाई आहे.

५. लेखी परिक्षेस उशीरा आलेल्या उमेदवारास परिक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही.

६. परिक्षा केंद्रात उमेदवारांना Writing Pad तसेच उत्तरपत्रिका लिहिण्यासाठी काळा बॉलपेन पुरविण्यात येईल. सोबत पेन, पेन्सिल, खोड रबर इत्यादी साहित्य परिक्षा केंद्रात नेण्यास प्रतिबंध आहे.

७. परिक्षा केंद्रात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली असल्याने उमेदवारांना पाण्याची बाटली परिक्षा केंद्रात नेण्यास मनाई आहे.

८. परिक्षा संपल्यानंतर उमेदवार त्यांना दिलेली प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिकेची कार्बन प्रत घेवुन जावु शकतात.

९. परिक्षा केंद्रात प्रवेश केलेल्या उमेदवारास परिक्षा संपेपर्यंत बाहेर जावु देण्यात येणार नाही.

१०. उत्तरपत्रिकेवर व लेखी परिक्षेच्या प्रवेशपत्रावर देण्यात आलेल्या सुचनांचे उमेदवारांनी तंतोतंत पालन करावे.

दिनांक :- २७/०३/२०२६

ठिकाण :- ठाणे.

(श्रीकांत पाठक)
अध्यक्ष पोलीस भरती प्रक्रिया २०२४-२५
तथा
अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, ठाणे